# बृहन्मुंबई महानगरपालिका



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महत्त्वाची स्थळे

## महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त
बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे भावपूर्ण अभिवादन !

वर्ष-२०२१

# चैत्यभूमी परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा

'कोविड-१९' चा प्रादुर्भाव लक्षात घेता यावर्षी चैत्यभूमी व लगतच्या परिसरात महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा आवश्यक ती काळजी घेऊन देण्यात येत आहेत. त्याबाबतचा व सामान्य परिस्थितीत दरवर्षी देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधांबाबत संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे आहे :

- ऑनलाईन प्रक्षेपण पुढील समाज माध्यम लिंकवर उपलब्ध : १. https://bit.ly/6december21YT २. https://bit.ly/6december21FB ३. https://bit.ly/6december21TT
- ऑनलाईन थेट प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी राहूनच डॉ. आंबेडकरांना अभिवादन करता येणार.
- चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.
- चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.
- येणाऱ्या अनुयायांसाठी आवश्यकतेनुसार 'कोविड-१९' ची चाचणी व इतर आरोग्य सोयी - सुविधा.

## दरवर्षी चैत्यभूमी / छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरात देण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा

१) शामियाना व व्ही. आय. पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.
२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणा प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्ग अशा ३ ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.
३) आवश्यकतेनुसार तात्पुरता निवारा.
४) मैदान व परिसरात फिरती शौचालये.
५) रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी फिरती शौचालये.
६) पिण्याच्या पाण्याच्या नळांची व्यवस्था.
७) रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याचे पाण्याचे टँकर्स.
८) कर्मचारी व वाहतूक व्यवस्थेमार्फत संपूर्ण परिसरात स्वच्छता.
९) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था.
१०) अग्निशमन दलामार्फत आवश्यक ती सेवा.
११) अग्निशमन दलामार्फत चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर सुरक्षा रक्षकांसहीत बोटीची व्यवस्था.
१२) चैत्यभूमीतील आदरांजलीचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.
१३) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात स्टॉल्सची रचना.
१४) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्कू निवासाची व्यवस्था.
१५) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरीता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.
१६) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरीता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.
१७) भ्रमणध्वनी चार्जिंगकरीता योग्य ती व्यवस्था.
१८) तात्पुरत्या स्नानगृहाची व फायबरच्या तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था.
१९) इंदू मिलच्या मागे फायबरची शौचालये व स्नानगृहे आदी व्यवस्था.
२०) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी बाकड्यांची व्यवस्था.
२१) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.

## दरवर्षी महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी देण्यात येणाऱ्या सेवा-सुविधा

२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा, दादर (पूर्व) येथे फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष, इत्यादी व्यवस्था.
२३) जी/उत्तर, दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि एफ/उत्तर, दादर (पूर्व) स्वामिनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष / माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.
२४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान असणाऱ्या राजगृह येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.
२५) एल विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला) परिसरात नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
२६) एम पश्चिम विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे आवश्यक ती व्यवस्था.

## सेवा - सुविधांबाबत संपर्क :

| किरण दिघावकर | हर्षद काळे | डॉ. संजीव कुमार |
| --- | --- | --- |
| सहाय्यक आयुक्त (जी / उत्तर) | उप आयुक्त (परिमंडळ - २) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) |
| दूरध्वनी : २४३९ ७८०० | दूरध्वनी : २४१५ ०४०० | दूरध्वनी : २२६२ ०४३३ |



## भारतरत्न
## डॉ. बाबासाहेब
## आंबेडकर :

दुर्दम्य आशावादाचे
प्रतीक



# महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना विनम्र आवाहन

महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीत महापरिनिर्वाण झाल्यानंतर मुंबईतील दादर चौपाटी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित होते. तद्नंतर प्रत्येक वर्षी ६ डिसेंबर रोजी लाखोंच्या संख्येने भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले अनुयायी चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर नतमस्तक होतात आणि अभिवादन करतात.

या प्रचंड जनसमुदायासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दरवर्षी विविध नागरी सेवा- सुविधा पुरविण्यात येतात. या सेवा-सुविधा प्रामुख्याने चैत्यभूमी परिसर व छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे उपलब्ध करुन देण्यात येतात. या सेवा - सुविधांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची सोय, शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, सुरक्षिततेसाठी धातू शोधक, क्लोज सर्किट टिव्ही, चैत्यभूमी-जवळील समुद्रात जीवरक्षक बोटी आणि अग्निशमन व नियंत्रण कक्ष सेवा इत्यादींचा समावेश आहे.

गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही 'कोविड-१९' अर्थात कोरोना विषाणू प्रादुर्भावाची स्थिती लक्षात घेता चैत्यभूमी व लगतच्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महापरिनिर्वाण दिनी पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा काही अंशी कमी करतानाच इतर काही विशेष सेवा यंदा पुरविण्यात येत आहेत. यात मुख्यत्वे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असलेल्या चैत्यभूमी येथून ऑनलाईन पद्धतीने थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या थेट ऑनलाईन प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी, स्थानिक परिसरात राहूनच अभिवादन करता येणार आहे. प्रत्यक्ष चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना दिली जाणार असून स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. 'कोविड-१९' संदर्भातील मार्गदर्शक सूचना पाळून सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

| डॉ. इ सिं चहल | ॲड. सुहास वाडकर | श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर |
|---|---|---|
| मा. महानगरपालिका आयुक्त | मा. उप महापौर, मुंबई | मा. महापौर, मुंबई |

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक चिरंतन प्रेरणा

परमपूज्य, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना निमित्ताने नमन करण्यासाठी दरवर्षी देशभरातून आणि विदेशातूनही मुंबईत चैत्यभूमीवर लाखोंच्या संख्येने अनुयायी येत असतात. विश्वरत्न म्हणून पूज्यनीय बाबासाहेबांचा आपण सारेच जण आदराने उल्लेख करतो. बाबासाहेबांनी देहरुपाने जग सोडून आता ६५ वर्षे झाली आहेत, मात्र त्यांच्या कर्तृत्वाचा, विचारांचा प्रभाव तसूभरही कमी न होता, तो विस्तारतो आहे. त्याचे प्रतीक म्हणजे चैत्यभूमीवर येणारे अनुयायी होय.

व्यक्ती असो, समाज असो किंवा देश, वाटचाल करताना योग्य दिशा महत्त्वाची असते, अन्यथा भरकटण्याचा धोका असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला दिलेले संविधान म्हणजे विचार, अभ्यास, समाजहित व राष्ट्रहित यांचा अपूर्व असा संगम आहे. त्या आधारे देशाची वाटचाल सुरु आहे. एखाद्या व्यक्तिची दूरदृष्टी किती प्रभावी आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चिरंतन असू शकते, याचे उदाहरण द्यायचे झाले तर भारतीय संविधानासारखे अन्य उदाहरण शोधून सापडणार नाही. काळाच्या पुढे पाहण्यासाठी, त्याला समाजाच्या व देशाच्या भल्यासाठी प्रत्यक्षात उतरवण्याकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जे कष्ट घेतले, त्याला तोड नाही. अमेरिकेमध्ये २० मे १९५६ रोजी भाषणात ते म्हणाले की, 'जेव्हा आपण समाजाविषयी बोलतो, तेव्हा त्याविषयी आपल्या मनात एकत्वाची धारणा असते. सामुदायिक प्रेरणा व व्यापक कल्याणाची इच्छा, सार्वजनिक उद्दिष्टांबद्दल निष्ठा, परस्पर तळमळ आणि सहकार्य ही समाज या एककाची गुणवैशिष्ट्ये असतात.' मला वाटतं, त्यांच्या या उद्गारांमध्येच संविधान निर्मितीमागील प्रेरणा सामावलेली आहे.

जवळपास दीडशे वर्षांच्या गुलामगिरीतून सुटका होण्यासाठी महत्प्रयासाने, मोठ्या संघर्षाने ज्या देशाने स्वातंत्र्य मिळवले, त्या देशाचे भविष्य उज्ज्वल असावे म्हणून संविधानाचा पाया अत्यंत खंबीर असणे आवश्यक होते. त्यावर कोट्यवधी जनतेचे, येणाऱ्या पिढ्यांचे भवितव्य अवलंबून आहे, हा विचारच किती दबाव निर्माण करणारा आहे. या दबावाला झेलू शकेल, त्याला यशस्वीपणे पेलू शकेल, अशी व्यक्ती म्हणून आदरणीय बाबासाहेबांची सर्वांनी निवड करावी, यातच त्यांची थोरवी सामावली आहे.

भारतीय प्रशासन सेवेमध्ये वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असताना शासनाने आखून दिलेल्या धोरणांची, योजनांची मी अंमलबजावणी केली. अनेकदा काही धोरणे, योजना, उपक्रम, प्रकल्प यांची आखणी व नियोजन देखील करावे लागले. कोणतेही धोरण बनविताना जनहित, अंमलबजावणीची शक्य-अशक्यता, सरकारचे हित, समाजावर होणारे दूरगामी परिणाम यांचा साकल्याने विचार करावा लागतो. दरवेळी असे धोरण, प्रकल्प आखताना मला डॉ. बाबासाहेबांची व संविधानाची आठवण येते. काही धोरणे, नियोजन असे असतात की, त्यांची आखणी करतानाच अधिक कालावधी लागतो. अशा स्थितीत, तीन वर्षांपेक्षाही कमी कालावधीमध्ये संविधान तयार करुन देशाच्या प्रगतीचा, नवनिर्माणाचा मार्ग बाबासाहेबांनी सुकर केला. हा आत्मविश्वास कित्येक पिढ्यांमध्ये एखाद्याच व्यक्तिच्या ठायी असू शकतो. मुंबई प्रांतिक विधिमंडळामध्ये १० मार्च १९२७ रोजी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, 'हव्याशा वाटणाऱ्या साऱ्या गोष्टी काही आभाळातून पडत नाहीत. प्रगती होण्यासाठी किंमत मोजावी लागते आणि जे मोजतील, त्यांनाच प्रगती साध्य करता येते.' बाबासाहेबांचे जीवन किती खडतर होते, ते सर्वश्रुत आहे. त्यांनी साध्य केलेल्या कामगिरीमागे, यशामागे मोठा त्याग होता. त्या अनुभवातूनच त्यांनी हे मत मांडले.

प्रचंड ज्ञानसाधना हे त्यांच्या जीवनाचे अनोखे वैशिष्ट्य होते. आपण संपादीत केलेले ज्ञान हे फक्त आपल्यापुरते सीमित न ठेवता त्याचा त्यांनी लोककल्याणासाठी उपयोग केला, हे महत्त्वाचे. व्यक्तिगत प्रगती साध्य करण्यापुरते मर्यादीत न राहता शिक्षण, आचार-विचार, ज्ञान या गोष्टींना त्यांच्या दृष्टिने अनन्यसाधारण महत्त्व होते. प्रत्येकाने आयुष्यात भौतिक प्रगतीपुरते बांधून न घेता वैचारिक व तात्विक जडणघडणीकडे लक्ष दिले पाहिजे. असा विकसित दृष्टिकोनच सामाजिक वाटचालीला योग्य मार्गावर नेवू शकतो, त्यासाठी शैक्षणिक विकास झाला पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. कोल्हापुरात दिनांक २४ डिसेंबर १९५२ रोजीच्या भाषणात ते म्हणाले होते की, 'मानवी आयुष्यातील ज्ञान ही पायाभूत गोष्ट आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढावी आणि टिकावी, तसेच त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्नशील राहावे.' विद्यार्थी दशेपासून आयुष्याच्या अखेरपर्यंत ज्ञानसाधनेचा अखंड यज्ञ करणाऱ्या डॉ. बाबासाहेबांच्या विविधांगी क्षेत्रातील कर्तबगारीचे गमकही हेच आहे. एका ज्ञानी माणसाला आयुष्यामध्ये किती क्षेत्रांमध्ये दैदिप्यमान यश मिळवता येऊ शकते, त्याचे परमोच्च उदाहरण म्हणजे बाबासाहेब होत.

ज्ञानसाधक, विचारवंत होवूनही डॉ. आंबेडकर यांनी आपल्या भूमिकांमधून कधीही तोल ढळू दिला नाही. विद्येसोबत आपल्यात शील अर्थात सदाचार असले पाहिजे, विद्येचे महत्व आणि उपयोग धारण करणाऱ्यावर अवलंबून असते, असे ते नेहमी म्हणत. ज्ञानी म्हणून वावरताना ते स्वतः सदाचारी राहण्यावर भर देत आले. त्यामुळेच राजकीय, सामाजिक, तात्विक, वैचारिक, धार्मिक अशी कोणतीही भूमिका घेताना त्यांनी आवश्यक तेथे आक्रमकपणा दाखवला तसा आवश्यक तेथे संयमीपणा, समंजसपणाही दाखवून दिला. त्यांच्या सर्व भूमिकांमागे स्वातंत्र्य, समता, बंधुभावाचे सामाजिक तत्वज्ञान होते. प्रत्येक बाबतीत स्वतःपेक्षा समाजाच्या कल्याणाचा, भवितव्याचा विचार करुन ते लढा देत राहिले. हा लढा कायम वैचारिक, तात्विक असाच होता.

'ज्या समाजात आपला जन्म झाला आहे, त्या समाजाचे उपकार आपण न विसरता फेडले पाहिजेत.' असे ते २३ नोव्हेंबर १९४० रोजीच्या मुंबईतल्या भाषणात म्हणाले होते. असे कोणतेही सामाजिक क्षेत्र नाही की ज्यामध्ये व्यासंग जडला आणि त्यांनी योगदान दिले नाही. कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, शिक्षण सुधारक, समाज सुधारक, विचारवंत, राजकीय प्रतिनिधी, पत्रकार, लेखक, कृषी-जल-कामगार यांसारख्या विषयांचे अभ्यासक व नीतिकार अशी एक ना अनेक क्षेत्रं सांगता येतील. खरेतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी कितीही लिहिले, सांगितले तरी त्यांची कारकीर्द, त्यांचे आयुष्य नेमक्या शब्दांमध्ये व्यक्त करणे सहजासहजी शक्य नाही, इतके ते मोठे आहे.

अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वास आदरांजली वाहण्यासाठी चैत्यभूमीवर येणाऱ्या लाखो अनुयायांना आवश्यक त्या सर्व सेवा-सुविधा देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेची यंत्रणा सतत राबत असते. राज्य शासन, इतर शासकीय यंत्रणा, विविध लोकप्रतिनिधी, सामाजिक संघटना, कार्यकर्ते व सर्वात महत्त्वाचे म्हणजे अनुयायांच्या सहकार्यातून महापरिनिर्वाण दिनाची कार्यवाही यथायोग्य पार पाडली जाते. एकमेकांच्या सहकार्याने, सर्वांना सोबत घेवून चालण्याची बाबासाहेबांची शिकवण ध्यानी ठेवूनच महानगरपालिका प्रशासन कार्यरत असते आणि याही पुढे कार्यरत राहील, ही ग्वाही आयुक्त या नात्याने देवू इच्छितो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना शतशः नमन!

**डॉ. इ सिं चहल**
**महानगरपालिका आयुक्त**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१८९१ : महू, मध्यप्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).
१९०७ : डॉ.आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली.
१९०८ : रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
१९१० : इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
१९१२ : बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१९१३ : वडील सुभेदार रामजी यांचे निधन (२ फेब्रुवारी).
१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली (१ जून).
१९१३ : उच्च शिक्षणाकरीता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना.
१९१५ : 'ॲन्शंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधावर एम. ए. ची उपाधी बहाल.
१९१६ : 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया : ए हिस्टॉरिकल ॲंड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.
१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.
१९१८ : सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).
१९२० : राजर्षी शाहू यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जाने.)
१९२० : माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद (१ मार्च).
१९२० : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद,नागपूर(१मे).
१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
१९२३ : डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल.
१९२४ : 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई (२० जुलै).
१९२६ : 'राजरत्न' या मुलाचे निधन (जुलै).
१९२७ : कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड (१९ मार्च).
१९२७ : 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन (३ एप्रिल).
१९२७ : मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड.
१९२७ : 'समाज समता संघ' ची स्थापना (४ सप्टेंबर).
१९२७ : डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन (१२ नोव्हेंबर).
१९२७ : अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह (१३ नोव्हेंबर).
१९२७ : महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर).
१९२८ : मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक (जून ).
१९२८ : 'समता' पाक्षिकाचा आरंभ (२९ जून).
१९२८ : 'सायमन कमिशन' पुढे साक्ष (२३ ऑक्टोबर).
१९२९ : अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण.
१९३० : काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ (३ मार्च).
१९३० : लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना (२ ऑक्टोबर).
१९३० : गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली (नोव्हेंबर).
१९३० : 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ (२४ नोव्हेंबर).
१९३१ : मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट (१४ ऑगस्ट).
१९३१ : अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध (८ ऑक्टोबर).
१९३१ : गांधी-आंबेडकर-पंचम जॉर्ज यांची भेट (२६ नोव्हेंबर).
१९३२ : पुणे करारावर स्वाक्षरी (२४ सप्टेंबर).
१९३५ : पत्नी रमाबाई यांचे निधन (२७ मे).
१९३५ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती (२ जून).
१९३५ : येवला, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा (१३ ऑक्टोबर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९३६ : 'जातीप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित (मे).
१९३६ : 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई (३१ मे).
१९३६ : स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना (१५ ऑगस्ट).
१९३७ : मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ.आंबेडकर विजयी (१७ फेब्रुवारी ).
१९३७ : कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरीता मुंबई विधिमंडळात बिल मांडले (१७ सप्टेंबर).
१९३८ : पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण (४ जानेवारी).
१९३८ : मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (१२-१३ फेब्रुवारी ).
१९३८ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरुन राजीनामा (मे ).
१९३८ : औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले (सप्टेंबर ).
१९३८ : स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह (७ नोव्हेंबर).
१९३९ : महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद - कॉंग्रेसच्या शेतकरी - विरोधी धोरणावर टीका (जानेवारी).
१९४० : सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट, मुंबई (२२ जून).
१९४० : 'थॉट्स ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
१९४२ : अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना (एप्रिल).
१९४२ : भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर (१९ जुलै).
१९४२ : मजूर मंत्री म्हणून निवड.
१९४३ : पुणे येथे विख्यात भाषण; 'रानडे, गांधी आणि जिन्ना' (१९ जानेवारी).
१९४५ : 'कॉंग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रति काय केले' ग्रंथ प्रकाशित (जून ).
१९४६ : मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (२० जून).
१९४६ : 'शूद्र पूर्वी कोण होते?' हा ग्रंथ प्रकाशित.
१९४६ : भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करु शकत नाही. संविधान सभेत भाषण (१७ डिसेंबर ).
१९४७ : भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश (ऑगस्ट).
१९४७ : संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड (२९ ऑगस्ट ).
१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह (१५ एप्रिल).
१९४८ : 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित (ऑक्टोबर).
१९४८ : सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्यासोबत भेट (सप्टेंबर).
१९४८ : घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला (४ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण (२५ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीने घटना स्वीकार केली (२६ नोव्हेंबर).
१९५० : 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध (मे).
१९५० : कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित (२५ मे).
१९५० : औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन (१९ जून ).
१९५१ : लोकप्रतिनिधीत्व विधेयक लोकसभेपुढे मांडले (मे ).
१९५१ : 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (सप्टेंबर ).
१९५१ : हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा (२७ सप्टेंबर).
१९५२ : प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव (जानेवारी ).
१९५२ : राज्यसभेसाठी निवड (मार्च).
१९५२ : कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी अर्पण (५ जून ).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९५३ : हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी अर्पण (१२ जानेवारी ).

१९५४ : 'महात्मा फुले' या चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित (३० जानेवारी).

१९५४ : भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव (मे).

१९५४ : आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण (३ ऑक्टोबर).

१९५४ : माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले (२८ ऑक्टोबर ).

१९५४ : रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित (डिसेंबर).

१९५५ : भारतीय बौद्ध महासभा स्थापित (४ मे ).

१९५६ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली (४ फेब्रुवारी).

१९५६ : 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा नरेपार्क, मुंबई येथे केली (२४ मे).

१९५६ : नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली (१४ ऑक्टोबर).

१९५६ : 'बौद्ध धम्म हा स्वीकारला' याविषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण (१५ ऑक्टोबर).

१९५६ : चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली (१६ ऑक्टोबर).

१९५६ : काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' हे अभूतपूर्व भाषण दिले (२० नोव्हेंबर).

१९५६ : दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (०६ डिसेंबर).

१९५६ : मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार (७ डिसेंबर).



# बाबासाहेबांचे तीन गुरु



तथागत गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

'' माझे आयुष्य तीन गुरु आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरु 'बुद्ध' होत. माझे दुसरे गुरु 'कबीर' आणि तिसरे गुरु म्हणजे 'जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत. पहिले दैवत 'विद्या' दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय'' (मुंबई, १९५४).

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# आज बाबा असते तर ...

- आचार्य प्र. के. अत्रे

नुकतेच आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले. शतकानुशतके या देशातील ज्या कोट्यवधी माणसांना माणुसकी नाकारण्यात आली, ज्यांना अस्पृश्य मानून जनावरांपेक्षाही हीन लेखण्यात आले, ज्यांचा पाळण्यापासून चितेपर्यंत अनन्वित छळ करण्यात आला, ज्यांची सावलीही अपवित्र मानण्यात आली, ज्यांना महारोग्याप्रमाणे गावाबाहेर राहण्याची क्रूर सजा ठोठावण्यात आली, सार्वजनिक पाणवठ्यावर तहान भागविण्याचा कुत्र्यामांजरांनाही असलेला हक्क ज्यांना नाकारण्यात आला, ज्यांना केवळ गलिच्छ आणि ओंगळ काम करण्यासच पात्र ठरविण्यात आले, ज्यांच्या केवळ नजरेनेही मंदिरातील प्रत्यक्ष परमेश्वरही विटाळतो, असे मानण्यात आले, ज्यांना केवळ एखाद्या व्यक्तिचे नव्हे तर सबंध स्पृश्य समाजाचे दास मानण्यात आले, त्यांच्यावरील अन्यायाची पुराणी तटबंदी दुभंगताना आम्ही पाहिली. त्या दलित समाजाचा एक प्रतिनिधी मुंबईच्या महापौर पदावर विराजमान झालेला आम्ही या डोळ्यांनी पाहिला. या देशातील सर्वश्रेष्ठ नगरीचा सर्वश्रेष्ठ नागरिक म्हणून एका अस्पृश्याच्या नावाने द्वाही फिरताना आणि ब्राह्मणांपासून सर्व जातीजमातींच्या हजारो लोकांच्या मुखातून एका 'महारा'च्या नावाचा जयघोष होताना आम्ही या कानांनी ऐकला. जेव्हा रिपब्लिकन पक्षाचे नेते पी. टी. बोराळे महापौर पदाच्या खुर्चीवर आरूढ होण्यासाठी चालू लागले, तेव्हा त्यांच्या प्रत्येक पावलाखाली अस्पृश्यतेचा अन्याय तुडविला जात आहे, असे आम्हाला वाटले. जेव्हा त्यांच्या गळ्यात पुष्पहारांपाठोपाठ पुष्पहार पडू लागले तेव्हा त्या प्रत्येक हारागणिक जातीभेदाच्या राक्षसाच्या गळ्याभोवती करकचून फास आवळले जात आहेत असा आम्हाला भास झाला. आमच्या डोळ्यात आनंदाश्रूंनी गर्दी केली आणि त्याचवेळी एका आठवणीने आमचे मन व्याकुळ होऊन आमच्या मुखातून उद्गार निघाले, 'बाबासाहेब आंबेडकर, आज आपण इथे हवे होता!'

खरेच, आज बाबा असते तर! आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेचे सर्व सामर्थ्य, आपल्या प्रचंड विद्वत्तेचे तेज, आपल्या जीवनशक्तीचा प्रत्येक कण पणाला लावून ज्या अन्यायाच्या पाषाणहृदयी भिंतीला त्यांनी आयुष्यभर धडक दिला; त्या भिंतीला एवढा मोठा सुरुंग लागलेला पाहून त्यांना धन्य वाटले असते. दलित फेडरेशनची नि नंतर रिपब्लिकन पक्षाची स्थापना करून त्यांनी दलितांच्या स्वाभिमानाची नि संघटनेची जी 'भीमशक्ती' जागृत केली तिचा सर्व मराठी जनतेच्या 'शिवशक्ती'बरोबर संयोग होताच, ती शक्ती अस्पृश्यतेला जाळू लागलेली पाहून ते किती सुखावले असते! हिंदूधर्मातील जातिभेदांच्या सामाजिक जुलूमशाहीपासून दलित जमातींना मुक्त करण्यासाठी जातिभेदविरहित बौद्धधर्माची 'धार्मिक लोकशाही' त्यांनी स्वीकारली.

## राष्ट्राच्या भवितव्याचा वेध घेणारा कालातीत द्रष्टा !

२६ जानेवारी १९५० रोजी आपण एका विसंगतीयुक्त जीवनात प्रवेश करणार आहोत, राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत. आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र, सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे, प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण नाकारीत राहणार आहोत. अशा परस्परविरोधी जीवनात आपण आणखी किती काळ राहणार आहोत ? आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात आपण आणखी किती काळ समता नाकारणार आहोत ? आपण जर ती अधिक काळपर्यंत नाकारीत राहिलो, तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत ते या संविधान सभेने अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाहीची संरचना उद्ध्वस्त करतील.

(भारतीय राज्यघटनेचा अंतिम मसुदा सादर करताना
संविधान सभेत केलेले भाषण, दिल्ली, २५ नोव्हेंबर, १९४९)

केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीतसुद्धा परिवर्तन करावयास हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही. सामाजिक लोकशाही म्हणजे काय ? तो एक जीवनमार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्त्वे म्हणून मान्यता देतो.

(संविधान सभा, दिल्ली २५ नोव्हेंबर, १९४९)


बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय







डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी



२६ जानेवारी, १९५० पासून स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा अंमल सुरु झाला. प्रजासत्ताक भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेबांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी शपथ दिली. पंतप्रधान पं. नेहरु शेजारी बसलेले (८ मे, १९५०)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मगांव महू (मध्यप्रदेश) येथील स्मारक




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन (ब्रिटन) येथील स्मारक


आपल्या घरी येणाऱ्या आरोग्य स्वयंसेवकांना सहकार्य करा, योग्य ती माहिती पूर्णपणे द्या !



मुंबईच्या हिंदू कॉलनीतील 'राजगृह' निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कुटुंबीय.
डावीकडून यशवंत (मुलगा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पत्नी रमाबाई आंबेडकर,
वहिनी लक्ष्मीबाई (आनंदराव यांच्या पत्नी), मुकुंदराव (पुतण्या) आणि त्यांचा आवडता श्वान टॉबी.
राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेब्रुवारी १९३४ मध्ये राहावयास आले.



रमाबाई आंबेडकर, लक्ष्मीबाई आंबेडकर (बसलेल्या, डावीकडून दुसऱ्या व तिसऱ्या)
यांच्यासह इतर नातलग मंडळी.



मुंबईतील परळ येथे बी. आय. टी. चाळ इमारत क्र. १ मधील क्रमांक ५० व ५१ ची
डॉ. बाबासाहेबांचे निवास असलेली खोली



नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रहावेळी पोलिसांनी सत्याग्रहींवर लाठीमार करतानाचे दृश्य.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी महाड येथील चवदार तळ्यावर पाणी पिण्याच्या हक्कासाठी सत्याग्रह करुन आपल्या सहकाऱ्यांसह चवदार तळ्याचे पाणी प्राशन केले.



महार सैनिकांच्या शौर्याचे प्रतीक : भीमा-कोरेगाव विजयस्तंभ
डॉ. आंबेडकर यांनी १ जानेवारी १९२७ रोजी आपल्या सहकाऱ्यांसह या विजयस्तंभाला भेट देऊन मानवंदना दिली.



घटना समितीने नेमलेल्या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा अंतिम मसुदा हा घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केला, तो ऐतिहासिक क्षण (२५ नोव्हेंबर १९४९ )

# भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक,

भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य

घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,

अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे

स्वातंत्र्य ; दर्जाची व संधीची समानता;

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये

व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस

नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे

संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# भारताचे संविधान

## भाग तीन

## मूलभूत हक्क

### समानतेचा हक्क

**१४. कायद्यापुढे समानता.** - राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

**१५. धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई.** -

(१) राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यांपैकी कोणत्याही कारणांवरुन कोणताही नागरिक –

(क) दुकाने, सार्वजनिक उपाहारगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यांत प्रवेश करणे ; किंवा

(ख) पूर्णतः किंवा अंशतः राज्याच्या निधीतून देखभाल करण्यात येणाऱ्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरताच खास नेमून दिलेल्या अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक वापरांच्या जागा यांचा वापर करणे,

यांबाबतीत कोणतीही निःसमर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्त यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

# भारताचे संविधान

### भाग चार -क

### मूलभूत कर्तव्य

## ५१ क. मूलभूत कर्तव्ये

(क) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यांमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे अनुसरण करणे ;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे ;

(घ) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे ;

(ङ) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे ; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे ;

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे ;

(छ) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यात सुधारणा करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे ;

(ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे ;

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे ;

(ञ) राष्ट्र सातत्याने, उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक स्वरुपाच्या सर्व कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे ;

(ट) मातापित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षांदरम्यानचे आपले अपत्य किंवा, यथास्थिति, पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे,

ही प्रत्येक भारतीय नागरिकाची कर्तव्ये असतील.



भारतीय घटना समितीच्या सन्माननीय सदस्यांसमवेत घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रस



भारतीय घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर, समवेत
मसुदा समितीचे सदस्य व कार्यालयीन अधिकारी (ऑगस्ट १९४७).



साद, पंडित नेहरु, वल्लभभाई पटेल व घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



घटना समितीची बैठक व चर्चा सुरु असताना मान्यवर सभासदांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



एलफिन्स्टन स्कूल, परळ, मुंबई



एलफिन्स्टन महाविद्यालय, मुंबई



कोलंबिया विद्यापीठ, अमेरिका.



लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल, लंडन (ब्रिटन) येथील छायाचित्र




गुरु नानक खालसा महाविद्यालय, माटुंगा, मुंबई



सिडेनहॅम महाविद्यालय, चर्चगेट, मुंबई



देहू रोड (जि. पुणे) येथे नव्याने बांधलेल्या बुद्धविहारात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माईंसमवेत २५ डिसेंबर १९५४ रोजी बुद्ध मूर्तीची स्थापना केली



धम्म चक्र प्रवर्तन, बौद्ध धम्माचे भारतात पुनरागमन, नागपूर, (१४ ऑक्टोबर १९५६).

## धम्मदीक्षा घेतल्यानंतर ‘मी बौद्ध धम्मच का स्वीकारला ?’ याचे जाहीर सभेत सविस्तर विवेचन करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर



ऑक्टोबर १९३५ मध्ये येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी “मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही”,अशी शपथ घेतली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी नागपूर येथे औपचारिकरीत्या बौद्ध धर्माचा स्वीकार लाखो अनुयायांसमवेत केला. तलवार किंवा बंदुकीच्या धाकाशिवाय आणि धनसंपत्तीचे कोणतेही आमिष दाखविल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्मान्तर झाल्याचे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात सापडणार नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बावीस प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारु पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इत:पर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.

# महापरिनिर्वाण दिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- ‘कोविड-१९’ म्हणजेच ‘कोरोनाचा’ प्रादुर्भाव लक्षात घेता संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना आपापल्या घरुनच अभिवादन करावे. याकरिता चैत्यभूमी येथून समाज-माध्यमांद्वारे ऑनलाईन थेट प्रक्षेपण सुविधा पुढील लिंकवर उपलब्ध :
  १. **https://bit.ly/6december21YT** २. **https://bit.ly/6december21FB**
  ३. **https://bit.ly/6december21TT**
- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते यांच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- बेवारस वस्तुंना स्पर्श करु नये व सदर बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा किंवा मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरीता पोलीस नियंत्रण कक्ष, महानगरपालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.
- मद्यपान व धूम्रपान करु नये, रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करु नये.
- समुद्रात जाऊ नये.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे. महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे / वापराचे पाणी वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**



बाबतपूर विमानतळ, बनारस/सारनाथ, येथील छायाचित्रात (डावीकडून) भंते धर्मरक्षित, भंते एच. सदातिस्सा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माईसाहेब आंबेडकर व भंते संघरत्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपलब्ध छायाचित्रांपैकी त्यांचे जिवंतपणीचे हे शेवटचे छायाचित्र आहे. (३० नोव्हेंबर १९५६)



६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्ली येथील २६, अलिपूर रोड या निवासस्थानी झोपेतच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जग सोडून गेले. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले.

# महामानवाचे महापरिनिर्वाण



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबरला त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे दहा तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दुःखाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. व्हिसेंट रोड (आताचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी ती दोन-तीन मैल लांबीची अंत्ययात्रा सात तासानंतर हळूहळू शिवाजी पार्क (आताचे छत्रपती शिवाजी महाराज मैदान) जवळच्या स्मशानभूमीवर येऊन पोहोचली. साश्रू नयनांनी 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागर या महामानवाला अखेरचा निरोप देतांना शोकाकुल झाला होता.



सुरक्षित अंतर कटाक्षाने पाळा, गर्दीच्या वेळी प्रवास तुम्ही टाळा !




चैत्यभूमी (दादर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेबांना अभिवादन करताना महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी, मा. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे, मा. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार, तत्कालीन मा. विधानसभा सभापती श्री. नाना पटोले, मा. शालेय शिक्षणमंत्री श्रीमती वर्षा गायकवाड, मा. सामाजिक न्यायमंत्री श्री. धनंजय मुंडे, मा. उर्जामंत्री डॉ. नितीन राऊत, मा. वस्त्रोद्योग, मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा पालकमंत्री (मुंबई शहर) श्री. अस्लम शेख, मा. पर्यटन, पर्यावरण, राज शिष्टाचारमंत्री तथा पालकमंत्री (मुंबई उपनगरे) श्री. आदित्य ठाकरे, मा. महापौर श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर व मान्यवर.



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

दुर्दम्य आशावादाचे प्रतीक



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन
## महानगरपालिका नियोजन समिती

अध्यक्ष - मा. महापौर
उपाध्यक्ष - मा. अध्यक्ष, स्थायी समिती
मानद सचिव - मा. महानगरपालिका आयुक्त
सर्व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त

### माननीय नियोजन समिती सदस्य

श्री. राहुल शेवाळे, खासदार
श्रीमती यामिनी जाधव, आमदार
सभागृह नेता
विरोधी पक्षनेता
अध्यक्ष, सुधार समिती
अध्यक्षा, शिक्षण समिती
अध्यक्ष, बेस्ट समिती
श्रीमती राखी जाधव, गटनेता - राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष
श्रीमती प्रितम पंडागळे - नगरसेविका
श्रीमती वैशाली नवीन शेवाळे - नगरसेविका
श्रीमती रोहिणी योगेश कांबळे - नगरसेविका
श्री. श्रीकांत गोविंद शेट्ये - नगरसेवक
श्रीमती प्रविणा मनिष मोरजकर - नगरसेविका
श्री. रामदास देविदास कांबळे - नगरसेवक
श्रीमती समिता कांबळे - नगरसेविका
श्रीमती उर्मिला उल्हास पांचाळ - नगरसेविका
श्रीमती समृद्धी काते - नगरसेविका
श्रीमती संगिता चंद्रकांत हंडोरे - नगरसेविका
श्रीमती प्रणिता योगेश गिरकर - नगरसेविका
ॲड. संतोष नामदेव (आबा) खरात, नगरसेवक
श्रीमती प्रतिभा खोपडे - नगरसेविका
श्रीमती चंद्रावती मोरे - नगरसेविका

## ■ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| व्यवस्था | दूरध्वनी |
|---|---|
| म.न.पा. नियंत्रण कक्ष | १९१६ |
| आपत्कालीन व्यवस्थापन | २२६९ ४७२५-२७ |
| म.न.पा. अग्निशमन दल (भायखळा) | १०१ आणि २३०७ ६१११ |
| म.न.पा. अग्निशमन दल (वडाळा) | २४१३ २०६०-६२, २४१३२०५८ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महानगरपालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अति. म.न.पा. आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अति. म.न.पा. आयुक्त (शहर) | २२६२ ०४३३ |
| अति. म.न.पा. आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| अति. म.न.पा. आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०१४९ |
| उप आयुक्त (परिमंडळ - २) | २४१५ ०४०० |
| सहाय्यक आयुक्त - जी/उत्तर विभाग | २४३९ ७८०० (वै.), २४३० ०५१३ |
| जनसंपर्क अधिकारी | २२७५ ४०२५ |

## ■ इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/२२०२ ४२४३ |
| मुंबई पोलीस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२० |
| पोलिस उप आयुक्त (परिमंडळ - ५) | २४८८८४२१/२४९२ ७३०८ |
| वाहतूक पोलिस | २४९३ ७७५५ |
| बेस्ट वाहतूक नियंत्रण कक्ष (वडाळा) | २४१४ ३६११ किंवा २४१४ ६५३३ |
| बेस्ट वाहतूक टोल फ्री क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१४ ४८९७ व २४१४ ५८८८ |
| नागरी सुरक्षा दल | २२८४ ३६६७ |
| होमगार्ड मुख्यालय | २२८४ २४२३ |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | २२०२ ६२४२ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७/९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई. | २४१२ २३९६/२४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |




चैत्यभूमी (दादर) येथील प्रवेशद्वार व भिमज्योत

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा-सुविधा व संबंधित माहिती




डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन (५ डिसेंबर २०२०).



छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा



१ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा



चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे धूळ होऊ नये यासाठी कार्पेट व्यवस्था.




नागरी सेवा सुविधा विषयक माहिती दालन व कॉफी टेबल पुस्तक विक्री केंद्र



धूम्र फवारणी करुन चैत्यभूमी परिसर निर्जंतुक करण्यात येतो.



विविध ठिकाणी फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात येते.



शॉवर असलेल्या स्नानगृहांची व्यवस्था करण्यात येते.

(संग्रहीत छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०१९ व २०२०)



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

## दुर्दम्य आशावादाचे प्रतीक




- महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
- अभिवादन रांग
- बाहेर जाण्याचा मार्ग
- वैद्यकिय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
- शिवाजी पार्क मैदानामध्ये अनुयायांकरिता १८ युनिटची (१८०) फिरती शौचालये व रांगेतील अनुयायांसाठी ०४ युनिटची (४०) फिरती शौचालये
- २०० स्नानगृहे
- निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
- वैद्यकीय कक्ष
- माननीय भंतेजी निवास व्यवस्था
- रुग्णवाहिका
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
- पोलिस नियंत्रण कक्ष
- अन्न वाटपाची व्यवस्था
- पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
- कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
- विद्युत खांब
- तात्पुरते अग्निशमन केंद्र
- जीवरक्षक बोटीची व्यवस्था
- तात्पुरती शौचालये
- पाण्याची सुविधा
- दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
- माहिती कक्ष
- श्रीमान बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळ
- प्लाझा सिनेमा






# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०१९ रोजीची व्यवस्था



बृहन्मुंबई महानगरपालिका

माझे कुटुंब
माझी जबाबदारी

# बनूया मिशन झिरोचे हिरो !

**अत्यावश्यक सेवांना 'मिशन झिरो' मध्ये पूर्ण साथ देऊन आपणही 'हिरो' बनूया**



'कोविड-१९' वर नियंत्रण मिळवून 'मिशन झिरो' च्या दिशेने मुंबई वेगाने प्रवास करीत आहे, मात्र आणखी काही काळ नियमांचे काटेकोर पालन करून मुंबईला 'कोविड'मुक्त बनवूया.

## 'मिशन झिरो' यशस्वी करण्यासाठी

- सार्वजनिक ठिकाणी वावरताना 'मास्क'चा योग्य वापर करा
- साबणाने अथवा 'सॅनिटायझर'ने हात वारंवार स्वच्छ धुवा
- 'कोविड'सदृश्य लक्षणे दिसल्यास त्वरित स्वतःला विलग करा
- वैद्यकीय सल्ल्यानुसार औषधोपचार घ्या. वेळच्यावेळी लसीकरण करवून घ्या.
- सुरक्षित अंतराचे पालन करा
- 'कोविड' लसीबाबत कोणत्याही प्रकारच्या अफवांवर विश्वास ठेवू नका.

**भारत सरकारची 'कोविड हेल्पलाईन'-१०७५ | बृहन्मुंबई म.न.पा. ची 'कोविड हेल्पलाईन'-१९१६**




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान 'राजगृह', हिंदू कॉलनी, दादर

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## कोविड-१९ बाबत माहिती, रुग्णशय्येची (बेड) आवश्यकता अथवा कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्रांची माहिती हवी असल्यास कृपया आपल्या विभागाच्या नियंत्रण कक्षाशी (वॉर्ड वॉर रुम) संपर्क साधावा.

| विभाग | प्रमुख परिसर | नियंत्रण कक्ष क्रमांक |
|---|---|---|
| ए | कुलाबा, फोर्ट, नेव्ही नगर, नरिमन पॉईंट | ०२२-२२७०००००७।०२२-२२७०००२३ |
| बी | मोहम्मद अली रोड, डोंगरी, भेंडी बाजार | ०२२-२३७५९०२३।०२२-२३७५९०२५ |
| सी | भूलेश्वर, नेताजी सुभाष मार्ग (अंशत:), मुंबादेवी, लोहार चाळ | ०२२-२२१९७३३१<br>९८१९७८२२८० |
| डी | ग्रँट रोड, वाळकेश्वर, मलबार हिल, गिरगांव | ०२२-२३८३५००४ । ८८७९७१३१३५ |
| ई | भायखळा, मदनपुरा, आग्रीपाडा, नागपाडा, डॉकयार्ड रोड, रे रोड, चिंचपोकळी | ०२२-२३७९७९०१<br>९३२१२९६०३५ |
| एफ दक्षिण | परळ, लालबाग, हिंदमाता | ०२२-२४१७७५०७ । ८६५७७९२८०९ |
| एफ उत्तर | माटुंगा, शीव (सायन), वडाळा, हिंदू कॉलनी | ०२२-२४०११३८० । ८८७९१४८२०३ |
| जी दक्षिण | वरळी, प्रभादेवी, महालक्ष्मी, लोअर परळ, करी रोड | ०२२-२४२१९५१५ । ७२०८७६४३६० |
| जी उत्तर | धारावी, कोळीवाडा, माहिम, दादर, छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) | ०२२-२४२१०४४१<br>८२९११६३७३९ |
| एच पूर्व | वांद्रे (पूर्व), खार (पूर्व), सांताक्रुझ (पूर्व) | ०२२-२६६३५४००।८८७९२०३९७८/७९ |
| एच पश्चिम | वांद्रे (पश्चिम), खार (पश्चिम), सांताक्रुझ (पश्चिम) | ०२२-२६४४०१२१ । ७३०४७५८११७ |
| के पश्चिम | अंधेरी (पश्चिम), जोगेश्वरी (पश्चिम), विलेपार्ले (पश्चिम) जुहू, वेसावे (वर्सोवा), लोखंडवाला संकुल | ०२२-२६२०८३८८ । ८९२८४४३६८७<br>८५९१३७२४४९ । ८५९१३८८२४३ |

| विभाग | प्रमुख परिसर | नियंत्रण कक्ष क्रमांक |
|---|---|---|
| के पूर्व | अंधेरी (पूर्व), जोगेश्वरी (पूर्व), विलेपार्ले (पूर्व) | ०२२-२६८४७००० । ८६५७९३३६८१ |
| पी दक्षिण | गोरेगांव, आरे कॉलनी, प्रेम नगर, गोकुळधाम | ०२२-२८७८०००८ । ८८२८४७६०९८<br>७३०४७७६०९८ |
| पी उत्तर | मालाड (पूर्व), मनोरीपाडा, मार्वे, अक्सा, मढ | ०२२-६९६० ००००<br>०२२- २८४४ ०००१ |
| आर दक्षिण | कांदिवली, चारकोप | ०२२-२८०५४७८८ । ८८२८४९५७४० |
| आर उत्तर | दहिसर | ०२२-२८९४७३५० । ८३६९३२४८१० |
| आर मध्य | बोरिवली, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान | ०२२-२८९४७३६० । ९९२००८९०९७ |
| एल | कुर्ला, साकीनाका, चांदिवली, असल्फा | ०२२-२६५०९९०१ । ७६७८०६१२७४<br>७७१०८७०५१० । ७३०४८८३३५९ |
| एम पूर्व | मानखुर्द, अणुशक्ती नगर, देवनार | ०२२-२५५२६३०१ । ९००४९८४८८७ |
| एम पश्चिम | चेंबूर, सिंधी कॉलनी, छेडा नगर, टिळकनगर | ०२२-२५२८४००० । ८५९१३३२४२१ |
| एन | घाटकोपर, विद्याविहार, पंतनगर | ०२२-२१०१०२०१ । ७२०८५४३७१७ |
| एस | भांडूप, पवई, कांजूरमार्ग, विक्रोळी, नाहूर | ०२२-२५९५४००० । ९००४८६९८३०<br>९००४८६९६६८ । ९००४८६९७२४ |
| टी | मुलुंड | ०२२-२५६९४००० । ८५९१३३५८२२ |

मास्क नियमित व योग्यरीत्या वापरा

हात वारंवार स्वच्छ धुवा

२ मीटरचे सुरक्षित अंतर पाळा

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी ऑनलाईन

### चला सारे मिळून करू
### डॉ. बाबासाहेबांना ऑनलाईन अभिवादन !



महामानव भारतरत्न

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

यांना

**कोटी कोटी अभिवादन**

- 'कोविड-१९' संसर्ग टाळण्यासाठी नागरिकांनी प्रतिबंधात्मक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- गेल्या वर्षी प्रमाणे यावर्षीही 'कोविड-१९' संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव असल्याने नागरिकांनी अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे.

Youtube
https://bit.ly/6december21YT

Facebook
https://bit.ly/6december21FB

Twitter
https://bit.ly/6december21TT

डॉ. इ सिं चहल
महानगरपालिका आयुक्त

ॲड. सुहास वाडकर
उप महापौर, मुंबई

श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर
महापौर, मुंबई

**नको गर्दी, नको संसर्ग - कोविडपासून करू आपलं नि आपल्यांचं रक्षण !**

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना विनम्र आवाहन

कोरोनावर हमखास असा तोडगा सापडेपर्यंत जीवनशैलीमध्ये बदल करणे अत्यावश्यक झाले आहे. तोंड, नाक व्यवस्थित झाकले जाईल अशा रितीने मास्क नेहमी वापरा. सर्वत्र वावरताना नागरिकांनी आपसात सुरक्षित अंतर राखावे. वारंवार हात स्वच्छ धुवावेत. गरजेनुसार निर्जंतुकीकरण द्रव्याचा (सॅनिटायझर) वापर करा. तसेच या त्रिसूत्रीपलीकडे जाऊन आता दैनंदिन जीवनात नवीन बदलांचा स्वीकार करणे भाग आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे काही महत्वाच्या मार्गदर्शक सूचना पाळा.

- लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांची योग्य काळजी घ्या. खासकरुन ज्यांना सहव्याधी (को-मॉर्बिडीटी) आहेत, त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यावे.
- प्रतिकारशक्ती टिकविण्यासाठी सकस आहार घ्यावा. पुरेशी झोप घ्यावी. व्यायाम करावा.
- कोणतेही लक्षण दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या.
- कोरोनाची लक्षणे असताना कुठे-कुठे गेलो, कोणाला भेटलो, ते आठवून नोंदी ठेवा.
- जेवताना समोरासमोर बसू नका. शेजारी-शेजारी बसा.
- कोणाशीही बोलताना थेट चेहऱ्याकडे बघू नका. एकमेकांच्या वस्तुंचा वापर करु नका.
- बाहेरुन आल्यावर आधी आंघोळ करावी. कपडे धुण्यासाठी थेट बादलीमध्ये टाकावेत.
- फरशी, स्वयंपाकगृह, प्रसाधनगृहे, इतर वस्तू यांची नेहमी स्वच्छता ठेवा.
- शक्यतो जिन्याचा उपयोग करा. लिफ्टची बटणे दाबताना कागदी कपटे वापरा.
- कोरोनासंबंधी कामकाजामध्ये शासकीय यंत्रणेला सहकार्य करा.
- मास्क नसल्यास दुकानांमध्ये ग्राहकांना प्रवेश देऊ नका. तसेच प्रवेश देताना ग्राहकांच्या हातांवर सॅनिटायझर फवारा.
- हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा. वातानुकूलन यंत्रणेचा वापर टाळा.
- व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वर्क फ्रॉम होम, ऑनलाईन कामकाज यावर भर द्या.
- वाहन चालवताना / प्रवास करतानाही मास्क लावा. त्यामुळे संसर्गाचा धोका टळतो.
- बंदिस्त व अरुंद वातावरण, दाटीवाटी, गर्दी, निकटचा संपर्क अशा बाबी प्रकर्षाने टाळा.
- कडीकोयंडा, कठडे (हॅण्ड रेलिंग), लिफ्ट, बाक असे कुठेही हात लावणे टाळा.
- कोणत्याही सूचनेचे नकळत उल्लंघन होत असल्यास एकमेकांच्या लक्षात आणून द्या.
- कोविड प्रतिबंधात्मक लसीकरण हे वेळच्यावेळी करवून घ्या.
- बृहन्मुंबई मनपाद्वारे व आरोग्य यंत्रणेद्वारे देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकारपणे पालन करा.

नजीकचे आरोग्य केंद्र, रुग्णालय, नियंत्रण कक्ष असे महत्त्वाचे संपर्क क्रमांक ठळकपणे आपल्या परिसरात प्रदर्शित करा.

**कोविड सोबत जगायला शिकूया ! नवीन जीवनशैली स्वीकारुया !!**

महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी भारतासह जगाच्या काना-कोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने अनुयायी चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर नत-मस्तक होण्यासाठी आणि अभिवादन करण्यासाठी दरवर्षी येत असतात. यास्तव बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतात. तथापि, मुंबईसह जगभरात 'कोविड-१९' चा प्रादुर्भाव असल्याने आवश्यक ती प्रतिबंधात्मक काळजी घेणे गरजेचे आहे.

| डॉ. इ सिं चहल | ॲड. सुहास वाडकर | श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर |
|---|---|---|
| महानगरपालिका आयुक्त | उप महापौर, मुंबई | महापौर, मुंबई |

**तानाजी कांबळे**, जनसंपर्क अधिकारी, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथून प्रकाशित केले.

। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई - ४०० ०११ ।

NS4519PRO-BMPP-52831-2021-22-100,000-Booklet